**राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना या केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाअंतर्गत मंजूर निधीच्या प्रमाणात केंद्रहिस्सा राज्यहिस्सा व अतिरिक्त राज्यहिस्सा अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास वित्तीय वर्ष २०२५-२६ अंतर्गत उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. विसउस/SNA-SPARSH/२०२५-२६/प्र.क्र.६०५**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : २ मार्च, २०२६**

**वाचा :**

१.शा.नि.क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४/दि.१० ऑक्टोंबर,२०२४
२.शासन परिपत्रक क्र.अधापु-२०२२-२०२२/प्र.क्र.४१/ना.पु.-२२/दि.२४ जानेवारी,२०२५
३. सहसंचालक,IT लेखा व कोषागारे,मुंबई यांचा दि.२४ जानेवारी,२०२५ रोजीचा ई-मेल
४.No.१५-०२/२०२५/NFSA/३८८८५०/Dated 7 th April 2025
५. No.Maharashtra/SNA-SPARSH/२०२५-NFSA/३८८३४३/Dated 18th June, 2025
६.शासन निर्णय क्र.विसउस/SNA-SPARSH/२०२४-२५/प्र.क्र.६०५/दि.२३ जून,२०२५
७. वित्त विभाग परिपत्रक क्र.पूरक-२०२५/प्र.क्र.८४/अर्थ-३/दि.५ जानेवारी,२०२६
८. ई-नस्ती क्र.FAD-१७०२३/३/२०२६-Desk-२,E-१५२६६१३ वरील वित्त विभागाची मंजुर टिपणी #३४
९.शासन ज्ञापन क्र.बीजीटी-२०२५/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प/सा.न्याय व विशेष सहाय्य विभाग/दि.२७ फेब्रुवारी,२०२६
१०.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासननिर्णय क्र. बीजीटी-२०२५/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प/दि.२७ फेब्रुवारी,२०२६

**प्रस्तावना**

केंद्रपुरस्कृत योजनांच्या प्रभावी निधी वितरणाकरीता केंद्रपुरस्कृत योजना SNA-SPARSH माध्यमातून कार्यान्वित करण्याबाबत केंद्रशासनाने दि.१३ जुलै,२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये कळविलेले आहे. संदर्भिय अ.क्र.१ च्या शासननिर्णयान्वये या विभागाची राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (CSS- ४०४८- Assistance to State Agencies for intra State movement of food grains and FPS dealers margin under NFSA (SLS- MH ५०५ -MH- Revision of norms for Central Assistance Released to States/UTs for meeting expenditure on Intra-state movement) SNA-SPARSH माध्यमातून कार्यान्वित करण्यासाठी अंर्तभूत केलेली आहे. त्यानुषंगाने भारतीय रिझर्व्ह बॅक येथे राज्य संलग्नित योजना (State Linked Schemes SLSs) निहाय स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account ) उघडण्यात आलेले आहे.

संदर्भिय अ.क्र.२ अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने सहसचिव/उपसचिव (नापु-२२), यांना Nodal Officer आणि वित्तीय सल्लागार व उपसचिव यांना Single Nodal Agency (SNA-SPARSH) घोषित करुन Single Nodal Account उघडण्याबाबत प्राधिकृत केलेले आहे. त्या अनुषंगाने वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या नावे रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेकरीता Single Nodal Account उघडलेले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना या केंद्रपुरस्कृत योजनेकरीता वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये संदर्भिय अ.क्र.४ व ५ अन्वये केंद्रशासनाने राज्यास सर्वसाधारण प्रवर्ग अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती असा प्रवर्गनिहाय Mother Sanction निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुषंगाने अनुसूचित जाती प्रवर्गाअंतर्गत

केंद्रशासनाकडुन उपलब्ध झालेला निधी खर्च करण्याकरीता केंद्रहिस्सा (४४०८०४५१), राज्यहिस्सा (४४०८०४६२), व अतिरिक्त राज्यहिस्याकरीता (४४०८०४७१) मागणी क्र.एन-०४ अंतर्गत वित्त विभाग व महालेखाकार मुंबई कार्यालयाच्या मान्यतेने स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहेत. सदर लेखाशिर्षाअंतर्गत विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पुरक मागणीद्वारे अनुक्रमे रु.५४.१८ कोटी, रु. ५४.१८ कोटी व रु.१२१.३६३२ कोटी असा एकूण रु.२२९.७२३२ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.

SNAP प्रणालीमध्ये केवळ केंद्र हिस्सा व राज्य हिश्श्याच्या लेखाशिर्षामधून निधी वितरणाकरीता सुविधा उपलब्ध आहे. अतिरिक्त राज्य हिस्स्यामधून (Top-Up) खर्च करण्याची स्वतंत्र लेखाशिर्षाची सुविधा SNA-SPARSH प्रणालीमध्ये सध्या विकसीत केलेली नसल्यामुळे SNA-SPARSH मधून प्रदान करण्यासाठी सध्या अतिरिक्त राज्यहिस्सा (Top-Up) च्या रक्कमा राज्य हिस्यामधून नोंदविण्यात याव्यात यासाठी Top-Up स्कीम चे आवश्यक अनुदान राज्यहिश्याच्या लेखाशिर्षामध्ये वर्ग करुन शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे सहसंचालक, IT संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी दि.२४ जानेवारी, २०२५ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविले आहे.

सबब केंद्रशासनाकडून संदर्भिय अ.क्र.४ व ५ अन्वये वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता राज्यास अनुसूचित जाती प्रवर्गासाठी मंजूर केलेला Mother Sanction निधी रु.२५,४९,४५,०००/- व त्याचा सममुल्य राज्यहिस्सा रु.२५,४९,४५,०००/- एवढा निधी अनुक्रमे केंद्रहिस्सा व राज्यहिस्सा अंतर्गत मुक्त करण्याकरीता तसेच उपरोक्त परिच्छेदामध्ये नमुद केल्यानूसार अतिरिक्त राज्यहिस्सा रक्कम रु.५७,१०,७७,०००/- एवढा निधी राज्यहिस्सा मध्ये वर्ग करुन खर्चाकरीता एकूण रु.१०८,०९,६७,०००/- एवढा निधी मुक्त करण्याकरीता सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास संदर्भीय अनुक्रमांक **८,९ व १०** अन्वये वित्त विभाग व सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

सबब, केंद्रशासनाकडुन अनुसूचित जाती प्रवर्गासाठी उपलब्ध Mother Sanction निधी रु.२५,४९,४५,०००/- त्याचा सममुल्य राज्यहिस्सा रु.२५,४९,४५,०००/- व अतिरिक्त राज्यहिस्सा रक्कम रु. ५७,१०,७७,०००/- असा एकुण निधी रु.१०८,०९,६७,०००/- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर ( BEAMS) वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (NFSA) या केंद्रपुरस्कृत योजनेकरीता केंद्र शासनाने संदर्भिय अ.क्र.४ व **५** अन्वये अनुसूचित जाती प्रवर्गास केंद्रहिस्सा रु.२५,४९,४५,०००/- एवढा Mother Sanction निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याच प्रमाणात राज्यहिस्सा रु.२५,४९,४५,०००/- (अक्षरी - पंचविस कोटी एकोणपन्नास लक्ष पंचेचाळीस हजार फक्त ) तसेच राज्य हिस्सा ५०% पेक्षा अतिरिक्त खर्चाकरीता रु. ५७,१०,७७,०००/- (अक्षरी - सत्तावन कोटी दहा लक्ष सत्याहत्तर हजार फक्त ) असा एकुण रु.१०८,०९,६७,०००/- ( अक्षरी -एकशे आठ कोटी नउ लक्ष सदुसष्ठ हजार फक्त ) इतका निधी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर ( BEAMS) वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त केंद्रहिस्सा रक्कम रु.२५,४९,४५,०००/- (अक्षरी -: पंचविस कोटी एकोणपन्नास लक्ष पंचेचाळीस हजार फक्त ) मागणी क्र. एन-०४ मुख्यलेखाशिर्ष ४४०८-अन्न साठवण व वखार यावरील भांडवली

खर्च, (०१)-अन्न, (७८९)- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत योजना (०१) (०१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेखालील अनुषंगिक खर्च- मुंबई शहर (केंद्र हिस्सा ५०%) (अनिवार्य) (४४०८०४५१) ५०, इतर खर्च या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता मंजुर अनुदानातुन वितरीत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त नमुद राज्य हिस्सा व अतिरिक्त राज्यहिस्साची एकुण रक्कम रु.८२,६०,२२,०००/- ( अक्षरी -: ब्याऐंशी कोटी साठ लक्ष बाविस हजार फक्त ) मागणी क्र. एन-०४ मुख्यलेखाशिर्ष ४४०८-अन्न साठवण व वखार यावरील भांडवली खर्च, (०१)-अन्न, (७८९)- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत योजना (०१) (०२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेखालील अनुषंगिक खर्च- मुंबई शहर (राज्य हिस्सा ५०%) (अनिवार्य) (४४०८०४६२) ५०, इतर खर्च या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष २०२५-२६ करीता मंजुर अनुदानातुन वितरीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका, वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमधील वित्तीय नियम तसेच वित्त विभागाने यापुर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष,वित्तीय अधिकारांचे केलेले प्रत्यायोजन व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासननिर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४,अर्थ-३,दिनांक ७.०४.२०२५ तसेच २९.०१.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात तसेच सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भिय अ.क्र.९ च्या ज्ञापनास व संदर्भिय अ.क्र.१० च्या शासननिर्णयास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, नागरी पुरवठा, मुंबई, ( वित्तीय सल्लागार व उपसचिव,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कार्यालय ) यांना सायबर कोषागार मुंबई येथे देयके सादर करण्याकरीता संदर्भ क्र. ६ अन्वये आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आलेले आहे. तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग हे राहतील.

७. सदरचा निधी SNA-SPARSH प्रणालीमधुन खर्च करण्याकरीता वितरीत करण्यात येत आहे तसेच या अंतर्गत अदा होणारे देयके हे बिनशर्त स्वरुपाचे राहील.

८. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२६०३०२१२००३२२१०६ असा आहे. हा आदेश निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGAWAN D GHADGE

Digitally signed by BHAGAWAN D GHADGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=594768D258A8666080FC21067F8670C4D266B96697D0C8D8CB65DD57AC09077D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=602F3A3CF9C6CA046F310EE1BA1CE4DC964C9612358A87F7261E09064EB4ABCB, cn=BHAGAWAN D GHADGE
Date: 2026.03.02 12:04:27 +05'30'

**( भगवान दत्तात्रय घाडगे )**
**वित्तीय सल्लागार व उपसचिव**

**प्रति :**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव
२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३.मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव
४.मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५.मा.मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
७.मा.राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव

८.मा. राज्यमंत्री, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव
९.मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
१०.मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
११.मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
१२.मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१३.मा.सचिव,लेखा व कोषागारे, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१४.सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व विभागीय आयुक्त
१६.सर्व जिल्हाअधिकारी
१७.नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
१८.सर्व उपआयुक्त (पुरवठा)
१९.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी
२०.सर्व उपसचिव/अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
२१.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
२२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/लेखापरिक्षा,महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई
२४.वित्त विभाग, (व्यय-१०)(अर्थसंकल्प-१६),मंत्रालय,मुंबई
२५.अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष)
२६.सायबर कोषागार अधिकारी,मुंबई
२७.निवडनस्ती (कार्यासन ४(अर्थ)